बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – ८३ । वार बुधवार दि २४ डिसेंबर २०२५ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 83 wednesday 24 December 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# किशोर पवार आले आणि गेवराईत वाळू माफियांचा नंगानाच सुरू झाला

# सिंदफणेसोबतच गोदावरी नदीपात्रांचीही खुलेआम लूट?

## डीवायएसपी अनिल कटके झोपेत की जाणूनबुजून दुर्लक्ष?

गेवराई तालुक्यातील सिंदफणा व गोदावरी नदीपात्रात सुरू असलेला अवैध वाळू उपसा हा आता लपूनछपून राहिलेला विषय नसून, दिवसाढवळ्या जेसीबी, केनी, ट्रॅक्टर व हायवांच्या साहाय्याने सुरू असलेला हा गैरव्यवहार थेट डीवायएसपी अनिल कटके यांच्या कार्यक्षेत्रात घडतो आहे. असे असताना उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांची जबाबदारी नेमकी काय, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. पोलीस ठाणे स्तरावर कारवाई होत नसेल, तर डीवायएसपींचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण कुठे आहे? की वाळू माफियांचा उच्छाद दिसत असूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असा संशय नागरिकांमध्ये बळावत आहे. अवैध वाळू उपशामुळे नदीपात्र उद्ध्वस्त होत असताना, पोलीस प्रशासनाची ही शांतता धक्कादायक ठरत आहे.

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक :– दिपक थोरात मो.९८६०९८५६४



# गेवराई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किशोर पवार तुपाशी, कायदा मात्र उपाशी वाळू माफियांसमोर पोलीस प्रशासन नतमस्तक?

## डीवायएसपी अनिल कटके यांची यंत्रणा कुठे आहे, कायद्याचे कंबरडे मोडत वाळू माफियांचा खुलेआम राज?

गेवराई । आरंभ वृत्तसेवा

गेवराई तालुक्यातील सिंदफणा व गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा अक्षरशः खुलेआम सुरू असून, या गंभीर प्रकरणात गेवराई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किशोर पवार यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जेसीबी, केनी, ट्रॅक्टर, हायवा यांसारख्या अवजड वाहनांच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असताना, पोलीस प्रशासनाकडून एकही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. दारू पिऊन नदीपात्रात काम करणारे वाळू माफिया, विरोध करणाऱ्या नागरिकांना दिल्या जाणाऱ्या उघड धमक्या, रात्री–रात्री होणारी अवजड वाहनांची वाहतूक हे सर्व प्रकार गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडत असतानाही प्रभारी अधिकारी किशोर पवार यांनी डोळेझाक का केली? हा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.





किशोर पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतरच गेवराईत वाळू माफियांचा नंगानाच वाढल्याचा आरोप होत असून, सिंदफणेसोबतच गोदावरी नदीपात्रही जेसीबी व केनीच्या घावांनी अक्षरशः उद्ध्वस्त होत आहे. यामुळे नदीपात्राची नासधूस होत असून नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. भीतीच्या वातावरणात जगणारे नागरिक, निवेदने देणारे सामाजिक कार्यकर्ते आणि माध्यमांतून होणारे सातत्यपूर्ण आरोप इतकं सगळं होऊनही प्रभारी अधिकारी किशोर पवार अजूनही मौन का बाळगत आहेत? हे मौन दुर्लक्ष आहे की मूक संमती? असा थेट आणि गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. दिवसाढवळ्या वाळू माफियांचा उच्छाद सुरू असून, नागरिकांना धमक्या देण्यात येत आहेत आणि नदीपात्र उद्ध्वस्त होत आहे. तरीही, गेवराई पोलीस ठाण्याचे प्रभारी किशोर पवार आणि डीवायएसपी अनिल कटके यांनी या प्रकरणात अस्वस्थतेची झोप घेत असून, वाळू माफियांवर ठोस कारवाई करत नाहीत. माफियांचा खुलेआम वर्चस्व, नागरिकांचा भय, आणि नदीपात्राची नासधूस झालेली स्थिती यावरून प्रशासकीय दुर्लक्ष स्पष्ट होते. आता तरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालावे, गेवराई पोलीस ठाण्याच्या कारभाराची सखोल चौकशी करावी आणि वाळू माफियांवरच नव्हे तर दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे. अन्यथा गेवराई तालुक्यात कायदा संपला असून, वाळू माफियांचाच कायदा चालतो, असा ठाम निष्कर्ष जनतेला काढावा लागेल, असा थेट इशाराही देण्यात येत आहे.

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे तात्काळ लक्ष आवश्यक?



गेवराई तालुक्यातील सिंदफणा व गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असून, जेसीबी, ट्रॅक्टर व हायवा यांसारख्या अवजड वाहनांचा वापर जोरात होत आहे. दिवसाढवळ्या वाळू माफियांचा उच्छाद सुरू असून, नागरिकांना धमक्या देण्यात येत आहेत आणि नदीपात्र उद्ध्वस्त होत आहे. या गंभीर परिस्थितीवर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे तात्काळ लक्ष देणे अत्यावश्यक ठरले आहे. गेवराई पोलीस ठाण्याच्या कारभाराचा सखोल आढावा घेऊन, अवैध वाळू उपशावर कठोर कारवाई करणे आणि माफियांच्या गुन्हेगारीला थेट रोखणे ही आता अत्यंत गरजेची बाब आहे.

### बीड शहरात निवडणूक निकाल प्रक्रिया शांततेत व शिस्तबद्धरीत्या पार



# बीड शहर पोलिसांचे उत्कृष्ट नियोजन

## नवनीत कॉवत यांच्याकडून कौतुक

बीड (प्रतिनिधी):– बीड शहरातील निवडणूक निकाल प्रक्रिया अत्यंत चुरशीची असतानाही बीड शहर पोलिसांनी केलेल्या काटेकोर नियोजनामुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत, सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींसाठी चार टप्प्यांमध्ये स्वतंत्र रांगा (टीर्शीशी) तयार करण्यात आल्या होत्या. मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता गर्दी चार भागांत विभागण्यात आली होती. त्यामुळे गर्दी नियंत्रण अधिक सुलभ, सुरक्षित व नियोजनबद्ध झाले. या व्यवस्थेमुळे मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश नियंत्रित पद्धतीने झाला व कोणताही गोंधळ, धक्काबुक्की अथवा अनुचित प्रकार घडला नाही. या बंदोबस्तासाठी बीड शहर पोलिसांनी १२० पोलीस कर्मचारी व ३० अधिकारी तैनात केले होते. शहराच्या प्रत्येक भागामध्ये फिक्स पॉईंट ठेवण्यात आले होते.

तसेच प्रत्येक पोलीस ठाण्याकडून दोन चारचाकी वाहनांद्वारे, एकूण आठ वाहनांमार्फत संपूर्ण शहरात विशेष गस्त घालण्यात आली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ढोल–ताशा, मिरवणूक व विजयी जल्लोषावर बंदी घालण्यात आली होती. यामुळे पराभूत व विजयी उमेदवारांमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता पूर्णपणे टाळण्यात आली. निकालाच्या दिवशी समाजकंटकांवर सुरुवातीपासूनच दबाव ठेवण्यात आला असून १४५ व्यक्तींना तडीपार करण्यात आले होते. बीड शहरातील निवडणूक व निकाल अत्यंत चुरशीचा

पान २ वर...

### राज्यमार्ग ओलांडून विद्यार्थ्यांना घ्यावे लागत आहे शिक्षण

# राज्य मार्गाला वरदळीच्या ठिकाणी गतिरोधक नसल्याने अपघाताला मिळत आहे निमंत्रण

टाकरवन (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील टाकरवन या ठिकाणी पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण घेण्याकरता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शाळा आहे. या ठिकाणी रोज एक हजार विद्यार्थी शिक्षण घेण्याकरता टाकरवन व परिसरातून येत आहेत परंतु शाळेपर्यंत पोहोचण्याकरता त्यांना राज्य मार्ग ओलांडून यावा लागत आहे. त्याचबरोबर शाळेच्या जवळ चौक असल्यामुळे या ठिकाणी नेहमीच नागरिकांची वर्दळ असते रस्ता चांगला असल्यामुळे वाहनाची मोठ्या प्रमाणावर ये जा असते. ह्या मार्गावरून काही वाहन चालक सुसाट अशा पद्धतीने वाहने चालवत

**राज्य मार्गावर गतिरोधक बसवण्याची पालक वर्गातून मागणी**

असल्यामुळे छोटे मोठे अपघात देखील या ठिकाणी नेहमीच घडत आहेत. यातच विद्यार्थी दिवसातून दोन वेळेस हा राज्यमार्ग त्यांना ओलांडवून शाळेमध्ये जावा लागत असल्यामुळे आता त्यांच्या जीवित धोका देखील निर्माण झालेला आहे. वाहनाची गती सुसाट असल्यामुळे च्या गतीला ब्रेक बसवण्याकरता चौकामध्ये गतिरोधक बसवणे अत्यंत गरजेचा आहे परंतु संबंधित राज्य मार्ग अधिकाऱ्याकडून या ठिकाणी गतिरोधक बसवण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप पालक वर्गातून केला जात आहे. या ठिकाणी चांगले दर्जेदार गतिरोधक बसवण्यात यावे या विषयाची शाळेच्या वतीने ग्रामपंचायतला लेखी निवेदन देखील दिले आहे. परंतु अद्यापही या ठिकाणी गतिरोधक न बसवल्यामुळे रोजच छोटे मोठे अपघात घडत आहेत. अपघात घडत असल्यामुळे पालक वर्गाला विद्यार्थ्यांची चिंता देखील लागली आहे. त्यामुळे ह्या चौकामध्ये लवकरात लवकर गतिरोधक बसून विद्यार्थ्यांची सुरक्षित इकडे लक्ष द्यावे अशी मागणी पालकातून केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीची कोल्हापूरहून सुखरूप सुटका व हरवलेल्या महिलेचा कर्नाटकात शोध

## पूजा पवार यांच्याकडून बीड शहर पोलिसांच्या पथकाचे कौतुक



बीड (प्रतिनिधी):– बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतून अपहरण झालेल्या एका अल्पवयीन मुलीची कोल्हापूर येथून सुखरूप सुटका करण्यात बीड शहर पोलिसांना यश आले आहे. सदर प्रकरणात तक्रार प्राप्त होताच तात्काळ गुन्हा नोंद करून तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. उपलब्ध तांत्रिक माहिती, गोपनीय सूत्रे व समन्वयित तपासाच्या आधारे पोलिस पथकाने कोल्हापूर येथे जाऊन अल्पवयीन मुलीची सुरक्षित सुटका केली. सुटकेनंतर मुलीची वैद्यकीय तपासणी करून तिला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. संबंधित आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू असून पुढील तपास चालू आहे. अशा प्रकारच्या गंभीर घटनांना कठोरपणे हाताळणे व तात्काळ तक्रारींना प्रतिसाद देणे याबाबत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्हाभर

पान २ वर...

### वृध्द महीलेस लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफास

# बळजबरीने चोरुन नेलेले सोने परत मिळवून दिले

बीड (प्रतिनिधी):- फिर्यादीनामे मालनबाई तुकाराम लाड, वय ८०, रा लाडेवडगांव ता. केज या पत्राचे शेडमध्ये रात्री एकटेच झोपलेले असताना अनोळखी चार चोरटयांनी त्याचे पत्राचे शेडमध्ये प्रवेश करुन बळजबरीने त्याचे अंगावरील सौन्याचे दागीणे कानातील फुले चोरुन घेवुन गेले होते. या वरुन पोलीस ठाणे युसुफ वडगांव गु.र.नं १५४/२०२५ कलम ३०९ (६) भा. न्या. संहीताप्रमाणे दिनांक १८.०६.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. वर



नमुद दाखल गुन्हयाचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथील पोउपनि महेश विघ्ने यांचे पथक सदरील गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. सदरील गुन्हा हा श्याम अजिनाथ शिंदे रा मांडवा ता वाशी जि. धाराशिव याने त्याचे साथीदाराचे मदतीने केल्याचे गुप्तबातमीदार व तांत्रिक विश्लेषण व्दारे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपीचे मागावर होते. दिनांक २०.१२.२०२५ रोजी गुप्तबातमीदारमार्फत माहीती मिळाली की, वर नमुद गुन्हयातील आरोपी श्याम अजिनाथ शिंदे हा केज येथील बसस्टॅन्ड वर येणार आहे. अशी माहीती मिळताच

पान २ वर...

### राष्ट्रवादीच्या सौ. रेणुकाताई संभाहरेना पुन्हा नशिबाची साथ,

# भाजपावर मात करत २१ मतांच्या शुभअंकाने मिळवलाय विजय!

गेवराई (प्रतिनिधी) राजकारणात नशिबाने साथ दिली तर काही होऊ शकते याची प्राचिती रविवार दिनांक २१ डिसेंबर रोजी गेवराई नगरपरिषद निवडणुकीतून दिसून आली. प्रभाग क्रमांक दहामध्ये झालेल्या राजकीय राड्यांची चर्चा संपूर्ण राज्यभर पसरली या प्रभाग क्रमांक दहा मधील दोन्ही उमेदवारांनी काट्यांच्या टक्करीत दमदार एंट्री मारल्याने अखेर राजकीय नशिबाचा लकी ड्रॉ म्हणून दोघेही भाग्यवान ठरले.नशीब बलवत्तर म्हणून नशिबाच्या बळावर उच्चशिक्षित असलेल्या सौ. रेणुका संभाहरे यांना नवनिर्वाचित नगरसेविका म्हणून होण्याचा मान मिळाला असल्यामुळे प्रभागात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले आहे.



गेवराई नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि. २१ डिसेंबर रविवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. रेणुका शिवलिंग आप्पा संभाहारे यांचे नशीब चांगलेच बलवत्तर असल्याचे दिसते. नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक मताधिक्य घेऊन नगराध्यासह १६ जागा जिंकल्या तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रभाग क्रमांक ०४ मध्ये माजी नगरसेवक दादासाहेब घोडके यांच्या अर्धांगिनी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ. संगीता दादासाहेब घोडके व शाहरुख ताजखान पठाण यांचा विजय झाला व १० यामध्ये गणेश रुकर यांच्या पत्नी सौ. रेणुका शिवलिंग आप्पा संभाहारे व शेख खाजा शेख कठुमिया हे केवळ १९ मतांच्या शुभअंकाने यशस्वीरित्या राजकारणाची तालीम त्यांनी रंगवली याच काट्यांच्या टक्करीची चर्चा गेवराई शहरात ऐकायला मिळत असल्याचे बोलले जात आहे विशेष म्हणजे निकालाची तारीख २१ विजय २१ मतांने हा योगायोगच रेणुका ताईंच्या नशिबी लाभला हिच रेणुकादेवीची कृपा म्हणावीच लागेल त्यामुळे राजकारणाची व नशिबाची दिशा बदलणारी ही निवडणूक ठरली आहे.

# शिक्षक रुजू न झाल्याने पुरूषोत्तमपुरी शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पुरूषोत्तमपुरी (ता. माजलगाव, जि. बीड) येथे बदलून आलेले शिक्षक आजतागायत शाळेत रुजू न झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याबाबत शाळा व्यवस्थापन समितीने जिल्हा परिषद, बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. शाळेत सध्या मुख्याध्यापक व एका शिक्षकाची पदे रिक्त असून एकूण तीन पदे रिक्त आहेत. मंजूर पदांपैकी केवळ ६ शिक्षक कार्यरत असून त्यातील एक शिक्षक तात्पुरत्या व्यवस्थेवर कार्यरत असल्याची माहिती अर्जात नमूद करण्यात आली आहे. यामुळे शाळेतील अध्यापन व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे.

या रिक्त पदांबाबत यापूर्वीही दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित कार्यालयाकडे अर्ज करण्यात आला होता. तसेच दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी गट शिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, माजलगाव यांच्याकडेही पर्यायी शिक्षक व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर एका निर्देशित शिक्षकाची ऑर्डर काढण्यात आली असली तरी अद्याप संबंधित शिक्षक शाळेत रुजू न झाल्याने परिस्थिती जैसे थे आहे.




# श्रीमंताचेच आई-वडील वृद्धाश्रमात का जातात?

दौलावडगाव :काळ जसा बदलत चाललेल्या आहे. तसे माणसाचे मनही लहान होत चालले आहे. या कलियुगात धावत्या प्रवाहात सोन्याच्या भिंती उभ्या राहिल्या, परंतु त्यातून मायेचा ओलावा सुगंध काहीसा नाहीसा झालेला दिसत आहे .आणि आज प्रश्न असा नाही की, आई वडील वृद्धाश्रमात का जातात, तर प्रश्न असा आहे की ?,ज्याच्या घरात श्रीमंतीचा सागर आहे, त्याच्याच घरात माणुसकीचा ओला दुष्काळ पडत चालला आहे....

मित्रानो आजच्या समाजात एक बोचरा प्रश्न वारंवार मनात येतो कि वृद्धाश्रमात प्रामुख्याने श्रीमंत घरातीलच आई-वडील का दिसतात? पैसा असूनही माणूस एकटा का पडत चालला आहे,याचे उत्तर शोधले तर आधुनिक जीवनशैलीचे वास्तव उलगडते.

श्रीमंत कुटुंबांमध्ये भौतिक सुखांची कमतरता कुठेही नसते. मोठ मोठी घरे, मोठ मोठ्या गाड्या, नोकरचाकर, उत्तम वैद्यकीय सुविधा हे सर्व काही श्रीमंता कडे असते; पण तरीही त्या श्रीमंताच्या घरात माणुसकीचा ऊबदारपणा लोप पावत चालला आहे. श्रीमंताच्या मुलाचे करिअर, श्रीमंताच्या मुलाचे व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा मानसन्मान आणि स्वतःच्या सुखामागे धावणारी पुढची पिढी हि आई-वडिलांसाठी वेळ काढू शकत नाही. मित्रांनो सर्व आई-वडील आपल्या मुलांना सांभाळतात ओ.... पण सर्व मुलं मिळून एका आई-वडिलांना का सांभाळू शकत नाहीत बरं..... हाही प्रश्न कधीतरी मनाला पडतो.माणसांना पैशाने सर्व काही विकत घेता येतात, पण प्रेम, संवाद पद, प्रतिष्ठा आणि आपुलकी विकत घेता येत नाही बरं...

श्रीमंतांची आयुष्ये अधिक गतिमान असतात. कारण ते परदेशात नोकरी करत असतात, त्यांना मोठमोठे पगार असतात. त्यांच्या हातामध्ये लाखो रुपये किमतीचे घड्याळ असते.. पण मित्रांनो एक लक्षात असू द्या, श्रीमंतांच्या हातात लाखो रुपये किमतीचे असलेले घड्याळ सुद्धा, तीच वेळ सांगते, आणि गरीबाच्या हातातील शंभर रुपये किमतीचे घड्याळ सुद्धा तीच वेळ सांगते.. त्यामुळे श्रीमंतीचा लय गर्व असू नये.. श्रीमंतांचे दौरे, पार्ट्या आणि व्यस्त वेळापत्रक यामुळे वृद्ध आई-वडील येवढ्या मोठ्या घरात असूनही एकटे पडतात. त्या आई-वडिलांबरोबर त्यांना बोलायला वेळ सुद्धा नसतो.त्यामुळे त्या वृद्ध आई-वडिलांना वेळ जात नाही.काही वेळेस त्यांना तर स्वतंत्र खोलीत पण ठेवले जाते, नोकरांकडे त्यांची जबाबदारी दिली जाते. अशा स्थितीत घर मोठे असले तरी ही वृद्धांच्या मनात एक प्रकारची रिकामी पोकळी निर्माण होते. कारण त्यांच्या बरोबर बोलण्यासाठी त्या घरात मध्ये कोणीही नसते. आणि त्यामुळे हळूहळू ते स्वतःला नकोसे समजू लागतात.... त्यामुळे त्यांना वृद्धाश्रमात जावे वाटते ,कारण त्या वृद्धाश्रमामध्ये त्यांच्यासोबत बोलण्यासाठी, वेळ घालवण्यासाठी कोणीतरी असते... गरीब किंवा मध्यमवर्गीय कुटुंबांत आजही आई-वडील मुलांमध्येच राहतात. आणि आपले नातवंडा हि सांभाळतात. आणि घरामध्ये कष्टाची वाटणी सुध्दा करतात. ते छोट्या घरात राहूनही एकमेकांसाठी वेळ काढत असतात. गरिबीमुळे नव्हे, तर संस्कारांमुळे ते कुटुंब एकत्र राहतात. मित्रांनो... सुंदर चेहरा सुद्धा एक दिवस म्हातारा होतो, बलाढ्य शरीर सुद्धा एक दिवस गळून पडतं, पद सुद्धा एक दिवस निघून जातं, गरिबांच्या घरामध्ये पैसा कमी असतो, पण माणुसकीची उब जास्त असते.... श्रीमंताच्या घरात सर्व काही सुख सुविधा असून सुद्धा, त्यांना आई-वडिलांकडे पाहण्यासाठी वेळ नसतो,म्हणूनच श्रीमंताचेच आई-वडील वृद्धाश्रमात जातात.... खरे श्रीमंत लोक हे बँक बॅलन्समध्ये नसून, आई-वडिलांना दिलेल्या वेळात, प्रेमात आणि सन्मानात आहे.कारण शेवटी माणसाला जगायला पैश्यापेक्षा माणसं जास्त लागतात.... त्यामुळे मित्रानो जीवनात जगत असताना जीवनातील एक निर्विवाद सत्य तुमच्या लक्षात असू द्या... मुलांना श्रीमंत होण्यासाठी शिकू नका? तर त्यांच्यामध्ये सर्वोत्तम संस्कार घडवण्यासाठी त्यांना शिकवा.... मित्रांनो माणसे कितीही कमवून ठेवले तरी बाकी राहते शून्य..... आणि संकटाच्या वेळी कामाला येते आपल्या कर्माने साठवलेले पुण्य.........



आदिनाथ माणिक ठोंबरे..
देऊळगाव घाट.
मो. ७६२०८९०२९९

# शेतकरी हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - गणेश बजगुडे पाटील

बीड (प्र्रतिनिधी):- जगाचा पोशिंदा असलेल्या माय बाप बळीराजाच्या न्याय हक्कासाठी उद्या दिनांक २५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथुन जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा निघणार असुन जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी उद्याच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे. कापसाला बारा हजार रुपये व सोयाबीनला सात हजार रुपये भाववाढ देण्यात यावी, हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजारसमित्या व खरेदी केंद्रावर गुन्हे दाखल करुन कठोरात कठोर कारवाई केली जावी, शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनांचे अनुदान, नुकसान भरपाई, पीकविमा तत्काळ विनाअट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत यासह विविध मागण्यांसाठी उद्या बीड येथे शेतकरी मोर्चा निघत असुन कुठल्याही पक्षाशी संबंधित नसलेला हा मोर्चा शेतकऱ्यांच्या न्याय मागण्या घेवुन या भारतीय जनता पक्षाच्या झोपलेल्या सरकारला जागे करुन सोयाबीन कापुस भाववाढीसह इतर मागण्या घेवुन काढण्यात येत असुन जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपली एकजूट दाखवत शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेल्या सरकारला धडा शिकवण्यासाठी व आपल्या हक्कासाठी उपस्थित राहावे असे आवाहन गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.





# तीन महिन्यापासून फरार आरोपी शिरूर पोलीसांनी पकडला

बीड (प्रतिनिधी):- शिरूर कासार पोलीस ठाणे गु.र.क्र. २४९/२५ कलम १०९, ४९, ११५(२),३५२,३५१(२),३(५) इछड मधील ०३ महिन्यापासून फरार असलेला पाहिजे आरोपी नामे शुभम बाळू केदार वय २४ वर्षे रा. वारणी, ता. शिरूर कासार हा दिनांक २३.१२.२५ रोजी रात्री ०६.३० वाजताच्या सुमारास माणूर, ता. शिरूर कासार परिसरात आल्याची गोपनीय बातमीदार मार्फत माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथकासह जाऊन आरोपी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. सदर कार्यवाही मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक देविदास खांडखुळे, पो ह १८४ /खाडे व पो ह ९५६ /रवींद्र नागरगोजे, पो ह १८६/अनिल तांदळे यांचा समावेश आहे. सविनय सादर.

पान १ वरून..

**बीड शहर पोलिसांचे उत्कृष्ट नियोजन**

असतानाही पोलिसांच्या सतर्कतेमुळे समाजकंटकांना कोणतीही संधी मिळाली नाही. या सर्व उपाययोजनांचा मोठा फायदा शहरातील शांतता, सलोखा व सुरक्षितता राखण्यास झाला असून, बीड शहर पोलिसांच्या या उत्कृष्ट नियोजनाचे सामान्य नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत व अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांनी दिलेल्या सूचनांनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांनी बीड शहरात प्रभावी अंमलबजावणी केली. या संपूर्ण प्रक्रियेत पोलीस निरीक्षक श्री. अशोक मुदीराज, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ, श्री. प्रवीण बांगर व श्री. मारुती खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सायंकाळी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी संपूर्ण पोलीस पथकाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

-----------------

**अल्पवयीन मुलीची कोल्हापूरहून सुखरूप**

स्पष्ट व कडक सूचना दिलेल्या आहेत. या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी बीड शहर पोलीस दलाकडून करण्यात येत असून, त्याच अनुषंगाने ही यशस्वी कारवाई पार पडली आहे. या संपूर्ण तपासात पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या नियोजनाखाली श्री. संजय राठोड व श्री. सुरेश तांबे यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावली. त्याचप्रमाणे, पोलीस अंमलदार सुशेन उगले यांनी कर्तव्यदक्षतेने कर्नाटक राज्यात जाऊन एका हरवलेल्या महिलेचा शोध घेत तिला सुखरूपपणे शोधून तिच्या पतीच्या ताब्यात दिले. या मानवीय व प्रशंसनीय कारवाईमुळे संबंधित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. या दोन्ही यशस्वी कारवाईमुळे तक्रारदार व पीडितांचे नातेवाईक यांच्याकडून बीड शहर पोलिसांचे मनापासून कौतुक करण्यात आले आहे. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांनी आपल्या कार्यालयात पोलिस पथकास बोलावून या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कौतुक करून दोन्ही अंमलदारांचा सत्कार केला. या संपूर्ण कारवाईदरम्यान अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य लाभले. अल्पवयीन मुली, महिला व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत बीड शहर पोलीस सदैव कटिबद्ध असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबले जात आहे.

-----------------

**बळजबरीने चोरुन नेलेले सोने परत मिळवून दिले**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तात्काळ केज येथे जावुन बसस्थानक परीसरात सापळा लावला. आरोपी श्याम अजिनाथ शिंदे हा बसमधुन खाली उतरत असताना पथकाने गराडा घालुन त्याला पकडले, त्यास गुन्हयासंदर्भाने विचारपुस करता त्याने सदरील गुन्हया त्याचे ईतर साथीदार २) विशाल अजिनाथ शिंदे, रा मांडवा ता. वाशी, ३) अमोल नाना शिंदे, रमेश नाना काळे दोन्ही रा कन्हेरवाडी, पारधी वस्ती वाशी, जि. धाराशिव यांनी मिळुन केल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यातुन चोरीस गेलेले ०९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीणे हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले असुन आरोपी सध्या कोठडीत आहे. सदरील कामगिरी ही श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/मच्छिंद्र शेंडगे (पो.स्टे युसुफ वडगांव), पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिपक खांडेकर, भागवत शेलार, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, चालक पोलीस हवालदार गणेश मराडे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

पान ४ वरून..

**स्वस्त धान्य दुकानांत 'विषारी' ज्वारीचा पुरवठा ३० कोटींच्या घोटाळ्याचा संशय!**

एजंट संस्थांना ब्लॅकलिस्ट करणे, जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडील पदभार तात्काळ काढून त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे, जिल्हा पणन अधिकारी व संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करणे. ही बाब अत्यंत गंभीर असून गरीब लाभार्थ्यांच्या जीवाशी खेळ करणारी असल्याचे सांगत, तात्काळ कारवाई न झाल्यास उच्चस्तरीय तक्रार व न्यायालयीन मार्ग अवलंबण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या वेळी अजय सरवदे (जिल्हाध्यक्ष), रोहन मगर, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, देवा गव्हाणे, प्रफुल्ल बचुटे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

-----------------

**४ लाखांची रोकड अन् २ लाखांच्या दागिन्यासह पाचव्या दिवशीच नवरीने ठोकली धूम!**

रोजी मुलीच्या मावशीने आणि एजंट महिलेने संजय यांना धमकावत 'मुलगी येणार नाही, तू परत फोन केला तर तुझ्यावर व तुझ्या मित्रांवर बलात्काराची केस करू' अशी धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संजय पवार यांनी अंमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपी दत्ता पंढरीनाथ पवार रा.सुपा ता.पाटोदा,पठाण पुर्ण नाव माहीत नाही रा.चोभानिमगाव ता.आष्टी, जयश्री रवी शिंदे रा.पंढरपूर (मावशी),रूपाली बाळू दिशागंज रा.ताडगाव जि.छत्रपती संभाजीनगर (नवरी),एजंट बाई नाव गाव माहीत नाही, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास अंमळनेर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ करीत आहेत.

-----------------

**शिरूर कासार तालुक्यामध्ये**

आहे. तसेच स्वस्त धान्य दुकानांमार्फत नागरिकांना वेळेत धान्य न मिळाल्यामुळे ऊसतोड मजुरांना कामाच्या ठिकाणी रेशन मिळण्यात अडचणी येत असून त्यांची मोठी गैरसोय होत आहे. वेळेवर व दर्जेदार धान्य वितरण न झाल्यास मजुरांचे उपजीविकेचे प्रश्न अधिक गंभीर होणार असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शिरूर कासार तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानांमार्फत चांगल्या दर्जाचे गहू, तांदूळ व ज्वारी वितरित करण्याची मागणी करण्यात आली आहे.व उसतोडणीला गेलेल्या लोकांचे धन्य कुठे जाते.प्रतेका धान्य दिले जात नाही आंगठा घेतला जातो.पावती दिली जात नाही.व धान्याचा कट्टा ५० किलोची भरती आसताना ४०किलो ३५ किलोच दिला जातो मग हे धान्य जाते कुठे याचा शोध मे.साहेबांनी घ्यावा आसे निवेदनात सांगितलं आहे आता या पुढे जर सगळ्या गोष्टीची पुरतात नाही केली तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.आणि मा.तहसीलदार साहेब यांना निवेदन दिले.त्या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख शिरूर कासार सोपान (काका) मोरे व उपजिल्हाप्रमुख बीड अजिनाथ (भाऊ) खेडकर.किसान सेना तालुका प्रमुख हारिमामा खेडकर.ठकसेन तुपे.युवा सेना तालुका प्रमुख साईनाथ ढाकणे.जाधव व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

--------------------

**डॉ.ज्योती घुंबरे यांच्याकडून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार**

लढविण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांचे विशेष आभार मानले. आगामी काळात भाजपचे सर्व नगरसेवक एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ.रविंद्र घुंबरे, नरेंद्र घुंबरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बीडच्या विकासासाठी भाजपचे नगरसेवक सक्षमपणे काम करतील : डॉ.ज्योती घुंबरे

माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येक मतदाराचे, कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकाचे मी मनापासून आभार मानते. निकाल काहीही असला, तरी या निवडणुकीतून भाजपची ताकद दिसून आली. शहरातून भारतीय जनता पक्षाचे १५ नगरसेवक निवडून आले असून, शहराच्या विकासासाठी भाजप सक्षमपणे काम करेल, याची मला पूर्ण खात्री आहे, असेही डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या.

----------------------

**नियोजित लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती**

बदल करू नये, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. जर नियोजित आराखड्यात बदल करण्यात आला, तर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणासाठी येणारे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या समोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात शेख युनूस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,माजी सैनिक अशोक येड (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, कुलदीप करपे, गणेश मस्के,प्रा.ज्ञानेश्वर राऊत, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजु गायके, अर्जुन सोनावणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

पार्श्वभूमी नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लातूर ते मुंबई हे अंतर सध्याच्या सुमारे १०-१२ तासांवरून ४-५ तासांत पूर्ण करण्याच्या उद्देशाने लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर करण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार हा मार्ग लातूर-अंबेजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण असा प्रस्तावित आहे. मात्र, प्रताप सरनाईक यांनी अंतर ६० ते ७० किलोमीटरने कमी होईल, खर्च व वेळेची बचत होईल आणि धाराशिव जिल्ह्यालाही लाभ होईल, असे कारण देत पर्यायी मार्ग सुचविला आहे. परंतु यामुळे बीड जिल्ह्यातील कृषीप्रधान शेतकरी व व्यावसायिकांना होणारा विकासाचा लाभ हिरावला जाणार असल्याने सदर प्रस्तावाला तीव्र विरोध करण्यात येत आहे.

------------------

**आज कुर्ला या ठिकाणी दिपकभाऊ बोऱ्हाडे**

समाजाच्या वतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे ,सदरील कार्यक्रम स्थळ दिनांक २४. डिसेंबर २०२५ वार बुधवार सायंकाळी ७. वाजता कुर्ला या ठिकाणी होणार आहे, जिल्हा परिषद शाळेचा प्रांगणामध्ये कार्यक्रम होणार आहे ,तरी यावेळी बीड जिल्ह्यातील सकल धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान आनंदवाडी चे सरपंच मोहन नाना देवकते यांनी केले आहे,

------------------

**२५ डिसेंबरच्या शेतकरी पुत्र हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सामील**

मागण्या खालील प्रमाणे असणार आहेत १) कापसाला किमान १२ ००० रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा २) सोयाबीनला किमान ७००० रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा ३) कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया (सी.सी.आय.) कडून होणारी फसवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा. ४) हमीभावापेक्षा कमी दाराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. ५) मार्केटमध्ये किंवा बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या मालाचा विक्री दर व खरेदी यामधील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा. ६) शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना सबसिडी, अनुदान, व पिक विमा, यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. या मागण्याकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होऊन महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र येऊन तीव्र आंदोलन करतील असा इशाराही यावेळी देण्यात आलेला आहे शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील ११ तालुक्यातून शेतकरी राजा मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती शेतकरी हक्क मोर्च्याच्या आयोजकाने दिलेली आहे. तसेच बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी बीड येथे गुरुवार दिनांक २५ डिसेंबर रोजी मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्ध पत्रकार द्वारे केले आहे

------------------

**प्रभाग क्रमांक ७ च्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार**

खान (ज्येष्ठ नेते, भाजप व समाजसेवक) शेख राजू (द्वारकाधीश) सागर शेख वसीम झैद कादरी (उपसंपादक) यावेळी बोलताना मुसा खान यांनी विश्वास व्यक्त केला की, जगदीश भैया गुरखुडे आणि सागर देशपांडे यांच्या माध्यमातून प्रभागातील विकासकामांना मोठी गती मिळेल. सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले

# दिव्यांग व्यक्तीला तिघांकडून लाथाबुक्यांनी मारहाण अंमळनेर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी: तहसिलला अर्ज करून आम्हाला नोटीस काढल्या असे म्हणत तिघांकडून दिव्यांग व्यक्तीला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना अंमळनेर पोलीस ठाणे हद्दीत घडली असुन याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलीस ठाणे हद्दीतील वाहली येथील रहवासी निकेश बलभीम सरोदे यांनी भावकीतीलच काही लोकांच्या विरोधात तहसिलला अर्ज करून त्या अनुषंगाने नोटीस काढल्या गेल्या,या नोटीस काढल्याचा राग मनात धरून कालीदास विठ्ठल सरोदे,हरिदास विठ्ठल सरोदे,संभाजी महादेव सरोदे रा.वाहली यांनी संगनमत करून लाथाबुक्यांनी पाठीत,छातीत मारहाण करत मूकामार दिला.व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली.या प्रकरणी २२ डिसेंबर रोजी अंमळनेर पोलीस ठाण्यात निकेश सरोदे याच्या फिर्यादीवरून तिनही आरोपी विरोधात कलम ११५(२)३५२,३५१(२),सहकलम ९२(अ) ९२(ब) अंपग अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ करीत आहेत.




## व्यंकटेश स्कूलची शैक्षणिक सहल उत्साहात



पिंपळनेर (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूलची शैक्षणिक सहल नुकतीच उत्साहात पार पडली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध इतिहासिक स्थळांना भेटी देऊन माहिती जमा केली. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले. पिंपळनेर येथे श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूल विविध उपक्रमात सहभागी असते विद्यार्थ्यांना सर्वगुणसंपन्न करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या या शाळेने गत दोन दिवसापूर्वी शैक्षणिक सहल चे आयोजन केले होते. या सहलमध्ये शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. श्री शैक्षणिक सहल पिंपळनेर येथून सुरू होऊन ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वेरूळ अजिंठा लेणी, घृष्णेश्वर मंदिर, भद्रा मारुती, सिद्धार्थ गार्डन, बीबी का मकबरा सह आदी प्रेक्षणीय स्थळे विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी शिक्षकांनी संबंधित वास्तूचे महत्त्व समजावून सांगितले. यानंतर सहल परतीच्या मार्गाला लागली आणि सायंकाळी विद्यालयात पोहोचली सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य टीटू नाईक, सहल प्रमुख दत्ता तोगे, उदय खरात, मुकिंदा आबुज, अंकिता डोरले, श्रद्धा नागेश, कैवल्या पवार व शिक्षकेतर कर्मचारी परमेश्वर वाळेकर, शंकर गाडे, तुकाराम जाधव यांनी परिश्रम घेतले.

## दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांत बाचा बाची, दगडफेकीत दोन जण जखमी

परळी (प्रतिनिधी):- शहरात नगरपालिकाची मतमोजणी झाल्यानंतर इस्लामपुरा बंगला परिसरात नगरसेवक पदाच्या दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांमध्ये रविवारी रात्री किरकोळ बाचा बाची होऊन साडे आठ नऊ वाजन्याच्या सुमारास त्याचे रूपांतर दगडफेकीत झाले. या घटनेत दोघेजण जखमी झाले आहेत.

परळी शहरात सकाळी १० पासुन नगर पालिका निवडणूकीची मतमोजणी झाली. त्यांनतर रात्री आठ वाजेपर्यंत आप आपल्या प्रभागात विजयी झालेले नगरसेवक, समर्थक आनंद साजरा करत असतांना इस्मामपुरा भागात मात्र दोन पराभूत नगरसेवकाच्या गटात बाचाबाची होऊन त्याचा परिणाम दगडफेकीच्या घटना घडली. या घटनेतील जखमींना परळी उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दरम्यान एका जखमीस पुढील उपचारासाठी रुग्णवाहिकेतून अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आले आहे. झालेल्या जखमी दोघांची प्रकृती सध्या स्थिर आहे. पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड, पोलीस जमादार संजय खताळ, आकाश जाधव यांच्यासह बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. उपजिल्हा रुग्णालयातील अपघात विभागाच्या बाहेर जखमींना भेटण्यासाठी त्यांच्या मित्र व नातेवाईकांची एकच गर्दी दिसुन आली. ही गर्दी रात्री उशिरा पर्यंत होती. मात्र पोलिसांच्या तत्काळ हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झाला नसून दोन्ही गटाने आपसात चर्चा करून समेट झाल्याची माहिती पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांनी दिली.

## राजकीय विश्लेषक बाबा घोडके यांचा अंदाज खरा ठरला

### अंदाजाप्रमाणे प्रभाग क्र ४ आणि १० चे उमेदवार विजयी

गेवराई, (आरंभ वृत्तसेवा):- गेवराई शहरातील सावता नगर येथील सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते बाबासाहेब घोडके हे गेल्या १० ते १५ वर्षांपासून अभ्यासपूर्ण लेखी राजकीय अंदाज काढत असून आतापर्यंत त्यांनी वर्तवलेले सर्वच अंदाज अचूक ठरत असून नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद गेवराई च्या निवडणुकीत राष्ट्रवादी चे उमेदवार प्रभाग क्र ४ चे संगिता दादासाहेब घोडके व शाहरुख ताजखॉ पठाण आणि प्रभाग क्र १० शेख खाजाभाई व रेणुका शिवलिंग संभाहरे यांचा विजय होणार असल्याचा अंदाज बाबासाहेब घोडके यांनी निवडणुकी पुर्वी सांगितले होते.दि. २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाल्यानंतर अंदाज खरा ठरला



शुष्म निरिक्षणाने त्यांनी अनेकांना तोंडी व लेखी नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्र ४ व १० चा अंदाज कळविले होते त्यानुसार त्यांचा अंदाज अचूक ठरला असल्याने त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. बाबसाहेब घोडके हे निवडणूक काळात राजकीय घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून आपले सर्व सोर्स वापरून व जनतेत जाऊन हे राजकीय अंदाज लावतात त्यानुसार त्यांचे अनेक अंदाज खरे ठरत असल्याने गेवराई शहरातील मित्रपरिवारात ते कायम चर्चेत असतात आतापर्यंत त्यांनी

लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, ग्रामपंचायत यासह विविध निवडणुकीचे अंदाज लावून ते आपल्या मित्र परिवाराला लेखी प्रत देऊन विश्वास व्यक्त करतात. आतापर्यंत त्यांनी अनेक निवडणुकीत काढलेले अंदाज अचूज ठरत असल्याने राजकीय अंदाजाबाबतचे ते एक अभ्यासू विश्लेषक म्हणून ओळखले जाऊ लागल्याने निवडणूक काळात त्यांना अनेक जण संपर्क करून अंदाज घेतात यांचा हा अंदाज अचूक ठरल्याने बाबासाहेब घोडके हे नाव चांगलेच चर्चेत येत असून त्यांचे सर्व पत्रकार बांधव, मित्र परिवारासह सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## तहसीलदार शेळके यांची मंडळ स्तरीय आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी):- पाली (ता. बीड) : महसूल मंडळ पाली येथे आज मा. तहसीलदार शेळके साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंडळ स्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस मंडळातील शेतकरी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, आशा सेविका, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शासनाचा सुशासन सप्ताह हा उपक्रम साजरा करण्यात आला. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांना विविध प्रकारची प्रमाणपत्रे व दाखले वितरित करण्यात आले. यामध्ये ऊसतोड कामगार ओळखपत्र, धरणग्रस्त प्रमाणपत्र, श्रावण बाळ योजना लाभपत्र, कुणबी दाखला, डोमेसाइल प्रमाणपत्र तसेच अग्रीस्टॅक प्रिंट यांचा समावेश होता. या कार्यक्रमात लाभार्थी म्हणून देवईबाई भुजंगराव



शिंदे, वृंदावणी बंडू जाधव, छायाबाई निवृत्ती रांजवन, हरिबाई श्रीराम रांजवन, सुशीला राजेंद्र रांजवन, जलसाबाई नामदेब रांजवन, देवना बाई चंद्रसेन तावरे, सुशीला विठ्ठल शिंदे, महादेव संजय रोहिटे, निखिल मिठु थोरात, दत्तात्रय बन्सीधर सिंघन, कचरू लहानू गायकवाड, सुशीलाबाई विठ्ठल शिंदे व चंद्रकला त्रिंबक रांजवन यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी मा. तहसीलदार शेळके साहेब यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती शेतकऱ्यांना दिली तसेच त्यांच्या अडी-अडचणी समजून घेत मार्गदर्शन केले. बैठकीच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी तहसीलदार साहेबांचे आभार मानले तसेच येथे उपस्थित असलेल्या सर्व ग्रामस्थांमधून या भागामध्ये अतिशय उत्कृष्ट महसूल प्रशासनाचे कर्तव्य बजावत असणाऱ्या शितलताई चाटे यांच्या उत्कृष्ट कार्याच्या बाबतीत देखील तहसीलदार साहेबांना गावकऱ्यांनी सांगितलं की शितलताई चाटे या अतिशय कर्तव्यदक्ष लेडी सिंघम म्हणून सर्वत्र बीड जिल्ह्यामध्ये व महसूल विभागामध्ये मंडळ निरीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत त्या आमच्या सर्वांच्या सुखदुःखामध्ये आपल्या आदेशानुसार सातत्याने सहभागी होऊन आमचे अडीअडचणी आपल्यापर्यंत आणून त्या सोडवण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात म्हणून त्यांच्या महसूल प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत कितीही आम्ही कौतुक केले तरी कमी आहे अशा मंडळ निरीक्षक आमच्या पाली महसूल विभागाला लाभणे म्हणजे आमचे सर्व या भागाच्या शेतकऱ्यांचे परम भाग्य आहे असे देखील आवर्जून सर्व उपस्थित शेतकरी बांधवांनी तहसीलदार शेळके साहेबांच्याकडे मंडळ अधिकारी शितलताई चाटे या पाली महसूल भागामध्ये महसूल करत असलेल्या त्या कर्तव्य बाबतीत समाधान व्यक्त केले

## कालिकादेवी विद्यालयाची,शैक्षणिक सहल आनंदात व उत्साहात संपन्न

शिरूर कासार (प्रतिनिधी):- कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची,'शैक्षणिक सहल' दि.१८ डिसेंबर २०२५ ते दि.२३ डिसेंबर २०२५ या कालावधीत विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय आनंदात व उत्साहात पार पडली.ही शैक्षणिक सहल शिरूर(कासार)ते श्री क्षेत्र पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन करून श्री क्षेत्र दत्त संस्थान नृसिंहाचीवाडी व कोल्हापूरच्या येथे पोहोंचली आणि श्री महालक्ष्मीचे मंदिर,ऐतिहासिक शाहू पॅलेस, रंकाळा तलाव,राधानगरी धरण या पर्यटन स्थळांचे सूक्ष्म निरीक्षण केल्याने कलात्मक गुणांना प्रेरणा मिळाली.कुडाळ येथे (मुक्काम) पुढे गोवा राज्यातील कलिंगुट बीच,तेथील प्रसिद्ध चर्च,श्री मंगेशी मंदिर,श्री शांता दुर्गा मंदिर तसेच



जगप्रसिद्ध भव्य-दिव्य 'बिर्ला मंदिर'या स्थळांचा नयनरम्य देखावा पाहिला.पुन्हा कुडाळ(मुक्काम)नंतर सिंधुदुर्ग किल्ला मालवण गणपतीपुळे तेथील समुद्राची भरती-ओहोटी,समुद्राची गाज व रोषणाई पाहिली.पुढे त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र नाणीजधाम व सातारा जिल्ह्यातील सज्जनगड क्षेत्र नाणीजधाम(मुक्काम)आणि पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथील प्रसिद्ध श्री क्षेत्र खंडेरायाचे दर्शन घेतले पुढे श्री क्षेत्र मोरगांव येथील श्री मयुरेश्वरांचे दर्शन घेऊन मोरगाव मार्गे शिरूर (कासार)असा मार्ग होता.महाराष्ट्रातील प्रसिद्ध असे ऐतिहासिक ठिकाणे,गड-किल्ले,निसर्गरम्य पर्यटणस्थळे व सौंदर्यस्थळांना भेटी दिल्यामुळे,विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना प्रेरणा मिळाली.विद्यार्थ्यांना आपल्या शूर राजांचा,सेनापतींचा व सैनिकांचा इतिहास आकलन व्हावा,हा या शैक्षणिक सहलीचा उद्देश होता.तो साध्य करत विद्यार्थ्यांनी विविध स्थळांचा,गड-किल्यांचा आनंद घेतला.खेळीमेळीच्या हर्ष-उल्हासात,गाण्यांच्या व गावअक्षरांच्या भेंड्या खेळत, मौज-मजा करत सहलीचा भरभरून आनंद घेतला.या सहलीच्या नियोजनासाठी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे,प्रा.नामदेव तरकसे प्रा.प्रशांत मळेकर,प्रा.संजय आव्हाड,प्रा.महादेव हांगे,रविंद्र बडे,जयेंद्र निकम,प्रा.सविता दराडे मॅडम,सौ.अनिता लाटे मॅडम इत्यादी शिक्षकांनी मेहनत घेतली.अशा प्रकारे विद्यालयाची शैक्षणिक सहल अतिशय आनंदात व उत्साहात संपन्न झाली व सुखरूप शाळेत पोहोंचली.

## क्रांतिजोती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सौ.अलका शिंदे(राऊत) यांची निवड

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील समस्त महिलांच्या वतीने आयोजित क्रांतिजोती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव २०२६ च्या समितीची बैठक श्रीमती ऍडव्होकेट उज्वला भोपळे, श्रीमती साधनाताई भोपळे, श्रीमती आशा गोरे, श्रीमती सविता राऊत, श्रीमती अलका आखाडे, श्रीमती सावित्री नितीन साखरे

यांच्या अध्यक्षतेखाली श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सभागृह सावता माळी चौक बीड येथे संपन्न होऊन सर्वानुमते सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी श्रीमती अलका शिंदे(राऊत), उपाध्यक्षपदी श्रीमती साधना साहेबराव भोपळे, सचिवपदी श्रीमती डॉ. वैशाली साळुंके, सहसचिवपदी श्रीमती नंदा साळुंके, कोषाध्यक्षपदी श्रीमती पुजा लांडगे, यांची निवड करण्यात आली. या बैठकीस श्रीमती मंगल काळे, श्रीमती मंदाकिनी राऊत,श्रीमती डॉ वैशाली साळुंखे,श्रीमती जयश्री




दुधाळ, श्रीमती छाया लांडगे, श्रीमती चित्रा घाडगे, श्रीमती नंदाताई साळुंके, श्रीमती प्रियंका जाधव (गोरे), श्रीमती वर्षा राऊत(लांडगे), श्रीमती डॉ.राजश्री चौधरी,श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती जयश्री शिंदे, श्रीमती कल्याणी शिंदे, श्रीमती सुरेखा भराटे, श्रीमती मैना राऊत, कु. अन्विता चौधरी, बेबीताई दुधाळ, श्रीमती उल्का शिंदे, श्रीमती गायबाई राऊत, श्रीमती स्वप्ना काळे, श्रीमती राजेश्री गवळी, श्रीमती रोहिणी घाडगे, श्रीमती पार्वती थोरात, श्रीमती कांचन थोरात, श्रीमती अश्विनी इंगळे, श्रीमती ज्योती काळे यांच्यासह बीड शहरातील समस्त सावित्रीच्या लेकी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जयंती समितीच्या वतीने श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सावता माळी चौक बीड येथे दिनांक २८.१२.२०२५ रोजी सकाळी १० वाजता वृक्षारोपण, रक्तदान , आरोग्य तपासणी शिबिर व रांगोळी स्पर्धेचे तसेच सायंकाळी ४ वाजता डॉ. नागेश गवळी यांचे व्याख्यान आयोजित केलेले असून दिनांक ०३.०१.२०२६ रोजी सकाळी ०७.३० वाजता महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा येथे अभिवादन सोहळा तसेच दुपारी ३ वाजता श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सावता माळी चौक बीड ते महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा पर्यंत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे वरील सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समिती व समस्त महिला मंडळ यांनी केलेले आहे

## संस्कार विद्यालयामध्ये साने गुरुजी जयंती उत्साहात साजरी



बीड (प्रतिनिधी) :- संस्कार विद्यालयातील तिसरी चौथी विभागात साने गुरुजी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्या निमित्त साने गुरुजी यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर मोराळे ताई यांनी विद्यार्थ्यांना साने गुरुजी यांच्या बद्दल गोष्टीमधून माहिती दिली. विभाग प्रमुख गिरी सरांनीही विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शोभाताई कुलकर्णी तर कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून मोराळे ताई उपस्थित होत्या. तसेच विभागाचे विभाग प्रमुख गिरी सर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळुंके ताई यांनी केले तर पाठक ताई यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी व शिक्षक सहकारी उपस्थित होते.

## जिल्हा रुग्णालयाला शिस्त लावणारे अधिकारी मिळाले म्हणून बीड जिल्ह्यामध्ये होत आहे सर्वत्र नागरिकांमधून समाधान व्यक्त


बीड (प्रतिनिधी):- गेल्या अनेक दिवसापासून बीड जिल्हा रुग्णालय बीड जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून अतिरिक्त पदभार डॉक्टर संजय राऊत यांनी उत्कृष्ट प्रकारे पाहिला होता त्यानंतर आता महाराष्ट्र राज्य आरोग्य शासनाकडून कायमस्वरूपी एक शिस्तप्रिय असे दबंग जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून अमरावती येथील डॉक्टर सतीश सोळंके साहेब यांचे नियुक्ती केली असून या मुळे बीड जिल्ह्यामधून सर्वत्र नागरिकांमधून एक आनंदाच्या आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे येत्या भविष्य काळामध्ये चांगल्या प्रकारे उत्कृष्ट आरोग्यसेवा बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना बीड जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून मिळेल अशी अपेक्षाही या वेळी बीड जिल्ह्याचे दबंग शिस्तप्रिय उत्कृष्ट अभ्यासक सुसंस्कृत व्यक्तिमत्व असलेले व नवनियुक्त जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून पदभार स्वीकारलेले डॉक्टर सतीश सोळंके साहेब यांच्याकडून सर्व नागरिक व्यक्त करत आहेत याच पार्श्वभूमीवर त्यांना



आज दैनिक न्याय टाइम्स परिवाराच्या वतीने व महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन डॉक्टर सतीश सोळंके बीड जिल्हा शल्य चिकित्सक साहेबांचे बीड जिल्ह्यामध्ये वेलकम आणि अभिनंदन करून त्यांना पुढील उत्कृष्ट आरोग्य सेवेसाठी शुभेच्छा देताना महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स चे बीड तालुका प्रतिनिधी पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर दिसत आहेत

### बीडमध्ये गरीबांच्या ताटावर घाला

# स्वस्त धान्य दुकानांत 'विषारी' ज्वारीचा पुरवठा ३० कोटींच्या घोटाळ्याचा संशय!



बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत (झऊड) स्वस्त धान्य दुकानांवर पुरवठा करण्यात आलेली ज्वारी (मालदांडी) ही अत्यंत निकृष्ट, मानवी उपभोगास अयोग्य व अन्न सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. लाभार्थ्यांनी ही ज्वारी घेण्यास उघड नकार दिला असून, सदर ज्वारी मानव तर सोडाच जनावरेही खात नसल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी व जिल्हा पणन अधिकारी यांच्या मार्फत खालील नमूद ८ सब-एजंट सहकारी संस्थांकडून शेतकऱ्यांकडील उच्च प्रतीची ज्वारी खरेदी केल्याचे दाखवून प्रत्यक्षात अत्यंत निकृष्ट दर्जाची ज्वारी मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. आधारभूत दर ३,४२१/- प्रति क्विंटलप्रमाणे एकूण ८९,९०५.५० क्विंटल ज्वारीची खरेदी दाखवण्यात आली असून, यासाठी सुमारे ३० कोटी ७५ लाख ६५ हजार इतकी रक्कम अदा केल्याचा तपशील समोर आला आहे.

खरेदी करण्यात आलेल्या ज्वारीचा दर्जा इतका निकृष्ट असल्याचे सांगण्यात येते की ती दळून भाकर तयार केली तरी खाण्यायोग्य नाही. कोणतीही प्रभावी गुणवत्ता तपासणी न करता ही ज्वारी थेट स्वस्त धान्य दुकानांवर पाठविण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई अंतर्गत कार्यरत जिल्हा पणन अधिकारी, संबंधित सब-एजंट संस्था व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यात आर्थिक संगनमतातून भ्रष्टाचार झाल्याचा ठोस संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ (कलम २६, २७, ५९), आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ (कलम ३ व ७), भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, १२०(इ) तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (कलम ७, १३(१)(व), १३(२)) अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीत पुढील तातडीच्या कारवाईची मागणी करण्यात आली आहे. खरेदी केलेली संपूर्ण ज्वारी तात्काळ जप्त करणे, स्वतंत्र प्रयोगशाळेमार्फत गुणवत्ता व मानवी उपभोगयोग्यता तपासणी करणे, लाभार्थ्यांना ज्वारी देण्यास तात्काळ स्थगिती देण्याचे आदेश काढणे, निकृष्ट ज्वारी पुरवठा करणाऱ्या सर्व सब- पान २ वर...

# ४ लाखांची रोकड अन् २ लाखांच्या दागिन्यासह पाचव्या दिवशीच नवरीने ठोकली धूम!

### पाटोदा तालुक्यातील गंडाळवाडी येथील प्रकार

आष्टी: लग्नाचे आमिष दाखवून तरुणाची आर्थिक फसवणूक केल्याची धक्कादायक घटना पाटोदा तालुक्यातील गंडाळवाडी येथे उघडकीस आली आहे. लग्नानंतर अवघ्या पाचव्या दिवशी नवरी घरातून पळून गेली असून, या प्रकरणी नवरदेवाची तब्बल ६ लाख रुपयांची फसवणूक झाली असून पाच जणांवर अंमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील काही दिवसांपासून बनावट लग्नाचे प्रकार सातत्याने घडत आहेत. पाटोदा तालुक्यातील गंडाळवाडी येथील ३४ वर्षीय तरूण संजय पि.शामराव पवार हे विवाहासाठी मुलीचा शोध घेत होते. आरोपी दत्ता पंढरीनाथ पवार रा. सुपा आणि पठाण रा. चोभा निमगाव यांनी संगनमत करून एका मुलीचे स्थळ सुचवले. त्यानंतर पंढरपूर येथे मुलीची पाहणी करण्यात आली. यावेळी मुलीची मावशी असल्याचे सांगणाऱ्या जयश्री रवी शिंदे आणि एका एजंट ने लग्नासाठी ४ लाख रुपये दिले. आणि संतोष भालेराव यांच्या म्हणण्यानुसार २ लाख रुपयांचे दागिने खरेदी केले. त्यानंतर १० डिसेंबर रोजी रुपाली बाळू दिशागंज (रा. लाडगाव, वैजापूर) हिच्याशी पंढरपूर येथे नोटरी पद्धतीने आणि नंतर गावी धार्मिक विधीने लग्न लावून देण्यात आले. लग्नानंतर पाच दिवस रुपाली सासरी चांगली वागली, मात्र १५ डिसेंबर रोजी रात्री ती घरातून कोणालाही काही न सांगता पळून गेली. संजय यांनी मध्यस्थांकडे विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर १७ डिसेंबर पान २ वर...

# शिरूर कासार तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप

### शिवसेनेचा इशारा शिरूर कासार तहसील समोर केले दळण

शिरूर कासार (प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमार्फत वितरित करण्यात येणारे गहू, तांदूळ व ज्वारी अत्यंत निकृष्ट व खराब दर्जाचे असल्याचा गंभीर आरोप शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला आहे . या संदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात शिधापत्रिकाधारक गरीब नागरिकांना वितरित करण्यात आलेली ज्वारी ही कुजलेली, किडलेली व आरोग्यास अपायकारक आहे. सदर धान्य नागरिकांना खाण्यासारखे नसुन जनावरांनाही खाण्यायोग्य नसल्याची स्थिती आहे. असे असतानाही कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता हे धान्य नागरिकांना वितरित करण्यात येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला पान २ वर...

# डॉ.ज्योती घुंबरे यांच्याकडून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

### निवडणूक लढविण्याची संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांचे मानले आभार



बीड (प्रतिनिधी) बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्या निवासस्थानी मंगळवारी (दि.२३) सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक मंगेश धोंगडे तसेच ड.नागेश तांबरे यांचा सन्मान केला. इतरही नगरसेवकांचा सत्कार केला जाणार असल्याचे सांगत डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या, पक्षाने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नगराध्यक्ष पदाची निवडणूक पान २ वर...

# आज कुर्ला या ठिकाणी दिपकभाऊ बोऱ्हाडे यांच्या उपस्थित गावभेट व संवाद महामेळावा



बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील कुर्ला या ठिकाणी २१ जानेवारीच्या मुंबईच्या मोर्चाच्या अनुषंगाने मल्हार योद्धा दिपकभाऊ बोऱ्हाडे यांच्या उपस्थित गाव भेट व संवाद मेळाव्याचे आयोजन यावेळी करण्यात आले आहे, गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाच्या एस,टी,चा आरक्षण प्रश्न प्रलंबित आहे ,यावेळी दिपकभाऊ बोऱ्हाडे हे राज्यभर दौरे करीत आहेत, २१ जानेवारी मुंबईच्या महामोर्चासाठी ते गावभेट दौरा करीत आहेत, यावेळी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाचा प्रश्न गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित यांनी उपस्थित केल्याबद्दल त्यांचा सकल धनगर पान २ वर...

# नियोजित लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्यावासियांवर अन्याय करू नये


बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातून प्रस्तावित असलेल्या लातूर-अंबेजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्याला डावलण्याचा प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.



परिवहनमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सदर द्रुतगती मार्ग लातूर-कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या मार्गाने नेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर केल्याचे समोर आले आहे. हा प्रस्ताव बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासावर अन्याय करणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

या महामार्गामुळे बीड जिल्ह्यात उद्योगधंदे, रोजगारनिर्मिती तसेच कृषी व कृषीपूरक व्यवसायाला मोठा चालना मिळणार असून शेतकऱ्यांचे उत्पादन मुंबई-ठाणे महानगर प्रदेशापर्यंत जलदगतीने पोहोचू शकणार आहे. त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार असताना बीड जिल्ह्याला वगळण्याचा कोणताही निर्णय अन्यायकारक ठरेल, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. पूर्वनियोजित लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात कोणताही पान २ वर...

# २५ डिसेंबरच्या शेतकरी पुत्र हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सामील व्हा-प्रा.बबनराव आंधळे



बीड (प्रतिनिधी):- दिनांक २४ १२ २०२५ महाराष्ट्र राज्यातील शेतकरी अत्यंत बिकट परिस्थितीतून जात आहे शेतीमालाच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला जसा पाहिजे तसा भाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झालेला आहे विशेष म्हणजे शेतकऱ्यांचे मुख्य पीक समजले जाणारे कापूस, सोयाबीन, तूर या प्रमुख पिकाचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी प्रमाणात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शेतकरी हक्क मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात येणार आहे या मोर्चामध्ये शेतकऱ्यांच्या प्रमुख पान २ वर...

# पंतप्रधान मोदींच्या पत्नी जशोदाबेन मोदी यांनी घेतले पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथाचे दर्शन

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- परळी यथील प्रभु वैजनाथाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी आणि पंतप्रधान मोदी यांचे बंधू अशोक मोदी यांनी ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र परळी येथील प्रभु वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. सोमवारी सकाळी पंतप्रधान पत्नी अतिशय साध्या वेशभूषेत प्रभुवैद्यनाथ मंदिरात दाखल झाल्या आणि अतिशय भक्तिभावाने त्यांनी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाची पूजा आणि विधिमता आरती केली. सोमवारी सकाळी यशोदा बँक मोदी आणि अशोक मोदी यांचे मंदिर परिसरात आगमन झाले यावेळी मंदिर प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले मंदिराच्या मुख्य पुजरांनी वैदिक मंत्र उच्चाराच्या जयघोषित सदर पूजा संपन्न केली, जशोदा बेन अत्यंत श्रद्धेने वैद्यनाथाचे दर्शन घेतले.



# प्रभाग क्रमांक ७ च्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार



बीड (प्रतिनिधी):- प्रभाग क्रमांक ७ मधील नवनिर्वाचित नगरसेवक जगदीश भैया गुरखुडे आणि सागर देशपांडे यांचा नुकताच भव्य सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोहळा ज्येष्ठ समाजसेवक आणि भाजपचे खंबीर नेतृत्व मुसा खान यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. निवडणुकीतील विजयानंतर जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सज्ज झालेल्या या दोन्ही लोकप्रतिनिधींचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती: ह्या सत्कार समारंभाला परिसरातील अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. यामध्ये प्रामुख्याने:ुसा पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

CMYK